RNI No. MAHBIL/2009/35529

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# भाग एक-कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ७, अंक १] गुरुवार ते बुधवार, जानेवारी ७-१३, २०२१/पौष १७-२३, शके १९४२ [पृष्ठे १५ किंमत : रुपये १४.००

## प्राधिकृत प्रकाशन
## शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी

### नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ डिसेंबर २०२०.

### अधिसूचना

क्रमांक टीपीएस-१२१९/९१६/प्र.क्र.८३/२०/नवि-१२.— ज्याअर्थी, ठाणे शहराची सुधारित विकास योजना (यापुढे जिचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) च्या कलम ३१ (१) अन्वये शासन नगरविकास विभागाची अधिसूचना क्रमांक टीपीएस-१२९७/१३१९/ प्र.क्र.१४८/९७/नवि-१२, दिनांक ४ ऑक्टोबर, १९९९ (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) अन्वये भागशः मंजूर झाली असून, ती दिनांक २२ नोव्हेंबर, १९९९ पासून अंमलात आली आहे आणि उक्त विकास योजनेच्या वगळलेल्या भागाची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) मधील तरतुदीनुसार शासन, नगरविकास विभागाची अधिसूचना क्र. टीपीएस १२०१/२७४/प्र.क्र.२८/२००९/नवि-१२, दिनांक ३ एप्रिल, २००३ रोजी मंजूर झाली असून दिनांक १४ मे, २००३ पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिकेने (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त महानगरपालिका " असा करण्यात आला आहे) उक्त अधिनियमातील कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून उक्त विकास योजनेतील जमिनीबाबत खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार फेरबदल प्रस्ताव दिनांक १४ मार्च २०१९ रोजीच्या पत्रान्वये शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.

| अ.क्र. | जमिनीचा तपशील | क्षेत्र (चौ.मी.) | मंजूर विकास योजनेनुसार जमीन वापर | ठाणे मनपाने म.प्रा.व न.र. अधि., १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये प्रस्तावित केलेला फेरबदल |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | मौ. दिवा येथील स.नं. १८४ पै. | ६०००.०० | रहिवास | विभाग मल प्रक्रिया केंद्र (STP)-१/ मल उदंचन केंद्र (PS)-१ |
| २ | मौ. दातिवली येथील स.नं. ६ पै., ५ पै., ७ पै., २२५ पै. | ७०००.०० | रहिवास | विभाग मल प्रक्रिया केंद्र (STP)-२/ मल उदंचन केंद्र (PS)-२ |
| ३ | मौ.साबे येथील स.नं. ३८ | १६०००.०० | रहिवास | विभाग मल प्रक्रिया केंद्र (STP)-३/ मल उदंचन केंद्र (PS)-३ |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ४ | मौ. देसाई येथील स.नं. ६२ पै., ६३ पै., | ५०००.०० | हरित विभाग | विभाग मल प्रक्रिया केंद्र (STP)-४/ मल उदंचन केंद्र (PS)-४ |
| ५ | मौ. दातिवली येथील स.नं. ८५ | ६२५.०० | हरित विभाग | मल उदंचन केंद्र (PS)-६ |
| ६ | मौ. देसाई येथील स.नं. १६२ | ४००.०० | हरित विभाग | मल उदंचन केंद्र (PS)-९ |
| ७ | मौ. डावले गाव, भोईर कंपाऊंड येथील स.नं.४६ | ४००.०० | हरित विभाग | मल उदंचन केंद्र (PS)-१० |
| ८ | मौ. शिळ, दोस्ती ग्रुप (जलकुंभ जवळ) स.नं. १६१ | ४००.०० | हरित विभाग | मल उदंचन केंद्र (PS)-११ |
| ९ | मौ. शिळ, (कल्याण रोड, टोयाटा जवळ) स.नं. २९ | ४००.०० | हरित विभाग | मल उदंचन केंद्र (PS)-१२ |

(यापुढे ज्यांचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदलांपैकी अ.क्र.१, २, ४, ५, ६, ७, ८, ९ येथील प्रस्तावित फेरबदल मंजूर करणे व अ.क्र.३ येथील प्रस्तावित फेरबदल नामंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोट-कलम (२) अन्वये व त्या अनुषंगाने शासनास प्राप्त असलेल्या इतर अधिकारांचा वापर करून शासन उक्त विकास योजनेतील प्रस्तावित फेरबदलापैकी अ.क्र. १, २, ४, ५, ६, ७, ८, ९ येथील प्रस्तावित फेरबदल खालील अटीसापेक्ष मंजूर करीत आहे व अ.क्र.३ येथील प्रस्तावित फेरबदल नामंजूर करीत आहे. आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजुरीच्या अधिसुचनेतील फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे.

## नोंद

उपरोक्त अ.क्र. १, २, ४, ५, ६, ७, ८, व ९ येथील फेरबदल प्रस्ताव खालील अटीसापेक्ष मंजूर करण्यात येत आहेत. सदरचे फेरबदल विकास योजना भाग नकाशावर दर्शविण्यात आले आहेत.

**अटी :-**

(१) STP-१/PS-१ व STP-२/ PS-२ ही आरक्षणे CRZ ने बाधित होत असल्याने सदरची आरक्षणे विकसित करण्यापूर्वी महाराष्ट्र कोस्टल झोन मॅनेजमेंट ॲथोरीटीची (एमसीझेडएमए) पूर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील.

(२) सदर सर्व मंजूर आरक्षणे विकसित करण्यापूर्वी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची मान्यता घेणे आवश्यक राहील.

(३) सदर सर्व मंजूर आरक्षणे विकसित करण्यापूर्वी सदर आरक्षणाकरिता आवश्यक तो पोहोचमार्ग ठाणे महानगरपालिकेने उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

२. सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना शासन **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनाकांपासून अंमलात येईल.

३. उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खालील नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधीकरिता उपलब्ध राहील.

(१) आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

(२) सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी-मुंबई.

(३) सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि. ठाणे.

४. सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**अशोक का. खांडेकर,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th Floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032.
Dated the 1st December 2020.

*NOTIFICATION*

No. TPS-1219/916/C.R.83/20/UD-12.— Whereas, the Revised Development Plan of the City of Thane (hereinafter referred to as "the said Development Plan") has been sanctioned partly by the Government in the Urban Development Department, under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No. TPS-1297/1319/CR-148/97/UD-12, dated the 4th October 1999 (hereinafter referred to as "the said Notification") and has come into force with effect from 22nd November, 1999 and the Excluded Part of the said Development Plan has been sanctioned by the Government in Urban Development Department under section 31(1) of the said Act, *vide* Notification No. TPS-1201/274/CR-28/2009/UD-12, dated the 3rd April, 2003 and has come into force with effect from 14th May 2003;

And whereas, Thane Municipal Corporation (hereinafter referred to as "the said Municipal Corporation"), after following the legal procedure under sub-section (*1*) of Section 37 of the said Act, has submitted a proposal for modification to the said Development Plan as described in the following Table, for its sanction to the Government, *vide* letter dated 14th March 2019.

| Sr. No. (1) | Land Details (2) | Area (sq.mt.) (3) | Proposal as per sanctioned Development Plan (4) | Modification proposed by the Thane Municipal Corporation u/s. 37(1) of the M.R.&T.P.Act. (5) |
|---|---|---|---|---|
| 1 | Village Diva, S.No. 184(pt.) | 6000.00 | Residential Zone | Sewerage Treatment Plant (STP-1) & Pumping Station(PS-1) |
| 2 | Village Dativali, S.No. 6(pt.), 5(pt.), 7(pt.), 225(pt.) | 7000.00 | Residential Zone | Sewerage Treatment Plant (STP-2) & Pumping Station(PS-2) |
| 3 | Village Sabe, S.No. 38 | 16000.00 | Residential Zone | Sewerage Treatment Plant (STP-3) & Pumping Station(PS-3) |
| 4 | Village Desai, S.No. 62(pt.), 63(pt.) | 5000.00 | Green Zone | Sewerage Treatment Plant (STP-4) & Pumping Station(PS-4) |
| 5 | Village Dativali, S.No. 85 | 625.00 | Green Zone | Pumping Station(PS-6) |
| 6 | Village Desai, S.No. 162 | 400.00 | Green Zone | Pumping Station(PS-9) |
| 7 | Village Davale, Near Bhoir Compound, S.No. 46 | 400.00 | Green Zone | Pumping Station(PS-10) |
| 8 | Village Shil, Near Dosti Group (ESR), S.No. 161 | 400.00 | Green Zone | Pumping Station(PS-11) |
| 9 | Village Shil, (Kalyan Road, Near Toyota), S.No. 29 | 400.00 | Green Zone | Pumping Station(PS-12) |

(hereinafter referred to as "the Proposed Modification");

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the Proposed Modification at Sr. No. 1, 2, 4, 5, 6, 7, 8 and 9 above and to reject the Proposed Modification at Sr. No. 3 ;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub section (*2*) of Section 37 of the said Act and all other powers enabling it in that behalf, the State Government hereby sanctions the Proposed Modification at Sr. No. 1, 2, 4, 5, 6, 7, 8 and 9 above with certain conditions as described below and refuses to accord sanction to the Proposed Modification at Sr. No. 3 :–

"In the Schedule of modifications appended with the said Notification, after the last entry, the following new entry shall be inserted *viz*.:–

**ENTRY**

" The modification proposals shown at Sr.No. 1, 2, 4, 5, 6, 7, 8 and 9 above are sanctioned subject to conditions, as described below. All these modifications are shown on the part plan of the said Development Plan.

*Conditions* .—

1. As the land under reservation is affected by CRZ, the prior permission of the Maharashtra Costal Zone Management Authority (MCZMA) should be obtained before developing the reservation of Sewerage Treatment Plant (STP-1) and Pumping Station (PS-1), Sewerage Treatment Plant (STP-2) and Pumping Station(PS-2).

2. The necessary No objection Certificate from Maharashtra Pollution Control Board should be obtained before developing all the aforesaid sanctioned reservations.

3. The necessary access should be provided by the Thane Municipal Corporation before developing all the aforesaid sanctioned reservations."

2. This Sanctioned modification shall come into force from the date of publication of this Notification in the *Maharashtra Government Gazette*.

3. The Part Plan of aforesaid sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month:

(*i*) The Commissioner, Thane Municipal Corporation, Thane.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Assistant Director of Town Planning, Thane Branch, Thane.

4. This notification shall also be published on the Government Website *www.maharashtra.gov.in*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ASHOK K. KHANDEKAR,
Section Officer.

## नगरविकास विभाग

४ था मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २३ नोव्हेंबर २०२०.

### अधिसूचना

क्रमांक-टिपीएस-१२१८/३७२७/प्र.क्र.१७५/१९/नवि-१२.— ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम " असा करण्यात आला आहे) चे कलम ११३ चे पोटकलम (१) अन्वये प्रदत्त अधिकाराचा वापर करून शासन नगरविकास, सार्वजनिक आरोग्य आणि गृहनिर्माण विभागाकडील अधिसूचना क्र. आरपीबी/११७१/१८१२४/११३/IW, दि. २० मार्च, १९७१, जी अधिसूचना क्र. ११७३/आयआरपीसी, दिनांक १६ ऑगस्ट १९७३ अन्वये सुधारित झालेली आहे, त्यानूसार सदर अधिसुचनेमध्ये नमूद विनिर्दिष्ट क्षेत्र नवी मुंबईच्या नवनगरासाठी अधिसूचनेद्वारे निर्देशित केलेले आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिसुचित क्षेत्र " असा करण्यात आला आहे);

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम ३१(१) अन्वये प्रदत्त अधिकाराचा वापर करून शासन नगरविकास आणि सार्वजनिक आरोग्य विभागाची अधिसूचना क्र. आरपीबी-११७५/६३५/बीयुडी-५, दिनांक १८ ऑगस्ट १९७९ सह अधिसूचना क्र. आरपीबी-११७५/६३५/नवि-५, दिनांक १८ जानेवारी, १९८० अन्वये (यापुढे जिचा उल्लेख " उक्त अधिसूचना " असा करण्यात आला आहे) उक्त अधिसूचित क्षेत्राची प्रारुप विकास योजना (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त विकास योजना " असा करण्यात आला आहे) मंजूर झाली असुन, ती दिनांक १ मार्च, १९८० पासून अंमलात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेमध्ये मानसरोवर-तळोजा रेल्वेमार्गाची आखणी दर्शविण्यात आली आहे. (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त रेल्वेमार्ग " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, शहर व औद्योगिक विकास महामंडळाने (सिडको) (यापुढे जिचा उल्लेख " उक्त महामंडळ " असा करण्यात आला आहे) उक्त अधिनियमातील कलम ३७(१) अन्वयेची सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून उक्त रेल्वेमार्गाची आखणी वगळून त्याखालील जमिनी ना-विकास विभाग, रहिवास विभाग, बुडलॅण्ड कॉरिडोर, प्रादेशिक उद्यान विभाग व औद्योगिक विभाग या वापर विभागात दर्शविण्याचा प्रस्ताव दिनांक ११ जुलै २०१८ च्या पत्रान्वये शासनाच्या मंजूरीकरीता सादर केला आहे (यापुढे ज्याचा उल्लेख " प्रस्तावित फेरबदल " असा करण्यात आला आहे) ;

आणि ज्याअर्थी, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर प्रस्तावित फेरबदल मंजूर करणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे ;

आणि त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाच्या कलम ३७ चे पोटकलम (२) अन्वये शासनास प्रदत्त असलेल्या शक्तींचा वापर करून शासन प्रस्तावित फेरबदल मंजूर करीत आहे आणि त्यासाठी उक्त विकास योजना मंजूरीच्या दिनांक १८ जानेवारी १९८० रोजीच्या अधिसुचनेतील फेरबदलाच्या अनुसूचीमध्ये शेवटच्या नोंदीनंतर पुढील नवीन नोंद समाविष्ट करण्यात येत आहे;

### नोंद

" मंजूर विकास योजनेच्या भाग नकाशात दर्शविल्याप्रमाणे मानसरोवर-तळोजा रेल्वेमार्गाची आखणी वगळण्यात येत आहे व उक्त रेल्वे मार्गाच्या आखणीमधून वगळलेली जमीन ' अे ' ते ' बी ' ना-विकास विभाग, ' बी ' ते ' सी ' व ' डी ' ते ' ई ' रहिवास विभाग, ' सी ' ते ' डी ' बुडलॅण्ड कॉरिडोर, ' ई ' ते ' जी ' प्रादेशिक उद्यान विभाग व ' जी ' ते 'एच' औद्योगिक विभाग या वापर विभागात समाविष्ट करण्यात येत आहे."

२. उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खालील नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधी करिता उपलब्ध राहील :—

(१) व्यवस्थापकीय संचालक, सिडको, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई.

(२) सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.

(३) सहाय्यक संचालक, नगर रचना, रायगड-अलिबाग शाखा, रायगड.

३. सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या *www.maharashtra.gov.in* वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**अशोक का. खांडेकर,**
कार्यासन अधिकारी.

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

4th floor, Main Building, Mantralaya, Mumbai 400 032. Dated the 23rd November 2020.

*NOTIFICATION*

No. TPS-1218/3727/CR-175/19/UD-12.— Whereas, the Government of Maharashtra in Urban Development, Public Health and Housing Department, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 113 of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") *vide* Notification No.RPB 1171/18124/113/IW, dated the 20th March, 1971, as amended by Notification No.1173/IRPC, dated the 16h August 1973, designated the area specified therein as the site for a New Town of Navi Mumbai (hereinafter referred to as " the said Notified Area ") ;

And whereas, the Government of Maharashtra in Urban Development and Public Health Department, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 31 of the said Act, *vide* Notification No. RPB 1175/635/BUD-5, dated the 18th August 1979, read with Notification No. RPB-1175/635/UD-5, dated the 18th January 1980, (hereinafter referred to as "the said Notification") sanctioned the Draft Development Plan (hereinafter referred to as "the said Development Plan) of the said Notified Area, which has come into effect from 1st March 1980;

And whereas, the alignment of Mansarovar-Taloja Railway line is shown in the said Development Plan, (hereinafter referred to as ' the said Railway line ') ;

And whereas, the City and Industrial Development Corporation (CIDCO) (hereinafter referred to 'as the said Corporation'), after following the legal procedure under sub-section (*1*) of section 37 of the said Act, has submitted a proposal *vide* letter dated 11th July 2018, so as to delete the said Railway line alignment and land so deleted is proposed to be included in No Development Zone, Residential Zone, Woodland Corridor, Regional Plan Zone and Industrial Zone (hereinafter referred to as ' the proposed modification ') ;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to sanction the proposed modification;

Now therefore, in exercise of the powers conferred under sub-section (*2*) of section 37 of the said Act, the State Government hereby sanctions the proposed modification and for that purpose in the Schedule of modification appended with the said notification, after the last entry, the following new entry shall be inserted *viz* :

**ENTRY**

"The alignment of Mansarovar-Taloja Railway line in sanctioned development plan is deleted and the land so deleted is included in No Development Zone from 'A' to 'B', in Residential Zone from 'B' To 'C' and 'D' to 'E', in Woodland Corrodor from 'C' to 'D', in Regional Park Zone from 'E' to 'G' and in Industrial Zone from 'G' to 'H' as shown on the part plan of the said Development Plan."

2. The part plan showing the aforesaid sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month :—

(*i*) The Managing Director, CIDCO, CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai.

(*ii*) The Joint Director of Town Planning, Konkan Division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

(*iii*) The Assistant Director of Town Planning, Raigad-Alibag Branch, Raigad.

3. This notification shall also be published on the Government website at *www.maharashtra.gov.in.*

By order and in the name of the Governor of Maharashtra,

ASHOK K KHANDEKAR,
Section Officer.

## THE COMMISSIONER OF POLICE, GREATER MUMBAI

### Order

(Under Section 144 of Criminal Procedure Code, 1973)

No. C.P./XI (6)/144/(Prohibitory Order)/2020.— Whereas based on the information received from various sources, it is apprehended that there is likehood of breach of peace and disturbance of public tranquility and also there is grave danger to human lives and loss of properties and the undersigned in the capacity of Execuitive Magistrate is fully satisfied that there are sufficient reasons / grounds for passing prohibitory orders under section 144 of Criminal Procedure Code (CrPC)-1973 to ensure that no untoward /unwated incidents occur.

2. WHEREAS it is considered expedient to issue prohibitory order for restricting movement and unlawful assembly of five or more persons for prevention of breach of peace, disturbance to public tranquility and danger to human lives and loss of properties and to prevent any kind of riot or affray in the areas within the jurisdiction of BKC and Kherwadi Police Station under the control of Commissioner of Police, Greater Mumbai.

3. Therefore I, Dr. Shivaji Rathod, Dy. Commissioner of Police, (Operations), Greater Mumbai and Executive Magistrate, *vide* powers conferred upon me u./sec 144 of the Criminal Procedure Code, 1973 (Act II of 1974) r/w the Commissioner of Police Greater Mumbai's Order dated 23rd December 1959 u/s 10 sub-section (*2*) of the Maharashtra Police Act, 1951 (Mah. Act XXII of 1951), with a view to maintain law and order and to avoid disturbances of public tranquility, do hereby, promulgate an order under section 144 Cr.PC, in BKC and Kherwadi Police Station limits prohibiting any public meeting or assembly of five or more persons or procession of any person and also prohibit entry of all types of vehicles carrying persons intending to participate in such unlawful assembly. This order does not apply to public gatherings that are taking place with the permission of competent authorities, and if anyone requires special exemption, they may apply to Commissioner of Police, Greater Mumbai.

4. This order shall come into force, within the jurisdiction of BKC and Kherwadi Police Station under the control of Commissioner of Police, Greater Mumbai, with effect from 00.01 hours on 22nd December 2020 and ending at 24.00 hours on 22nd December 2020 unless withdrawn earlier.

5. Any person contravening this order shall be punishable under section 188 of the Indian Penal Code.

6. As the notice cannot be served individually on all concerned, the order is hereby passed *ex-parte*. It shall be published for the information of public, through press, or by affixing copies on the Notice Boards of the police stations, Divisional ACsP, Zonal DCsP,

Given under my hand and seal this on 21st day of the December 2020 at Mumbai.

DR. SHIVAJI RATHOD,
Dy. Commissioner of Police (Operations),
and Executive Magistrate, Greater Mumbai.

## THE COMMISSIONER OF POLICE, GREATER MUMBAI

### Order

(Under Section 144 of Criminal Procedure Code, 1973)

No. CP/XI (6)/144/(Prohibitory Order)/2020.— Whereas, in exercise of powers, conferred under Section 2 of the Epidemic Disease Act, 1897, read with all other enabling provisions of the Disaster Management Act, 2005, the Government of Maharashtra, issued directions vide Notification No. DMU/2020/CR 92/DisM-1, Dated 21st December, 2020 to take certain emergency measures to prevent and contain the spread of COVID-19 virus, Night Curfew (11-00 p.m. to 6-00 a.m.) will be in force from 22nd December 2020 till 5th January 2021 in all the limits of the Municipal Corporation of the State.

2. Whereas, in the aforementioned notification, Government of Maharashtra issued direction that the guidelines issued *vide* order dated 30th September, 2020, 14th October, 2020, 23rd October, 2020, 29th October, 2020, 3rd November 2020, 14th November 2020, 23rd November 2020 and 27th November 2020 to Operationalize MISSION BEGIN AGAIN for easing of restrictions and phase-wise opening, will remain in force till 05th Janunary, 2021 for containment of COVID-19 epidemic;

3. Whereas, in the aforementioned notification the Government of Maharashtra has directed that the activities already allowed and permitted from time to time shall be continued and all earliar order shall be aligned with that order and shall remain in force up to 05th January, 2021.

4. Therefore, I, Dr. Shivaji Rathod, Dy. Commissioner of Police (Operations), Greater Mumbai and Executive Magistrate, *vide* powers conferred upon me u/s. 144 of the Criminal Procedure Code, 1973 (Act II of 1974) r/w the Commissioner of Police Greater Mumbai's Order dated 23rd December 1959 u/s 10 sub-section (*2*) of the Maharashtra Police Act, 1951 (Mah. Act XXII of 1951), with a view to prevent danger to human life, health or safety, do hereby, promulgate an order under section 144 Cr.PC, in the areas under the control of Commissioner of Police, Greater Mumbai to maintain the Social Distancing Norms (minimum of 6 feet of distance), use of face coverings and to observe the directions issued by The Government of Maharashtra *vide* Order No.DMU/2020/CR.92/DisM-1, Dated: 30th September 2020, No.DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 14th Octobr 2020, Order No.DMU/2020/CR.92/DisM-1, Dated 29th October 2020, No. DMU/2020/CR 92/DisM-1, Dated 27th November, 2020 and DMU/2020/CR 92/DisM-1, Dated : 21st December, 2020 regarding Easing of Restrictions and Phase-wise opening of Lockdown (MISSION BEGIN AGAIN), Night Curfew (11-00 p.m. to 6-00 a.m.) will be in force from 22nd December 2020 till 5th January 2021 within the limits of Greater Mumbai Muncipal Corporation during this Night Curfew. Assembly of 5 or more persons will be prohibited and such other orders issued by the competent authorities in this behalf. This order will include all exemptions provided to essential services and goods in past orders issued by the Goverment of Maharashtra and Greater Mumbai Municipal Corporation from time to time.

5. The Zonal DCsP in emergent /special cases are empowered to grant exemption/ permission.

6. This order shall come into force, in the areas under the control of Commissioner of Police, Greater Mumbai, with effect from 00-01 hours on 22nd December 2020 and ending at 24-00 hours on 5th January 2021 unless withdrawn earlier.

7. Any person contravening this order shall be punishable under section 188 of the Indian Penal Code, 1860 in addition to penal provisions under Disaster Management Act, 2005 and with other legal provisions as applicable.

8. As the notice can not be served individually on all concerned, the order is hereby passed ex-perte. It shall be published for the information of public, through press, or by affixing copies on the Notice Boards of the police stations, Divisional ACsP, Zonal DCsP.

Given under my hand and seal this on 22nd day of the December, 2020 at Mumbai.

Dr. SHIVAJI RATHOD,
Dy. Commissioner of Police (Operations),
and Executive Magistrate, Greater Mumbai.

## उप विभागीय दंडाधिकारी, पनवेल यांजकडून

### जाहीर नोटीस

क्रमांक उविदं/फौजदारी/कात-२/अ.मृ./अधिसूचना प्र./२०२०.— सोबतच्या यादीतील इसम अ. क्र. १ ते ७ हे त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कारणामुळे मयत झालेले असून त्याप्रमाणे अंतिम समरी मंजूर होणेबाबत उप विभागीय पोलीस अधिकारी, खालापूर विभाग, खालापूर, जि. रायगड यांनी फौजदारी संहिता १९७३ चे कलम १७४ अन्वये, या कार्यालयाकडे अहवाल सादर केला आहे. खालील यादीतील इसम यांचे नावासमोर नमूद केलेल्या मृत्यूच्या कारणाखेरीज त्यांचा मृत्यू इतर कारणामुळे झालेला आहे अगर कसे? या संबंधात कोणाची काही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस **शासन राजपत्रात** प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत मा. उप विभागीय दंडाधिकारी, पनवेल, उप विभाग पनवेल यांचेकडे लेखी तक्रार करावी.

वरील मुदतीत कोणतीही तक्रार आली नाही तर उप विभागीय पोलीस अधिकारी, खालापूर विभाग, खालापूर, जि. रायगड यांनी सादर केल्याप्रमाणे यादीत नमूद केलेल्या इसमांचे आकस्मिक मयतांचे वर्गीकर करणेत येईल.

पोलीस ठाणे रसायनी, ता. पनवेल, जि. रायगड

### परिशिष्ट

| अ.क्र. (१) | मयताचे नाव (२) | पत्ता (३) | मृत्यूचे कारण (४) | अ.मृ.र.नं. (५) | मयत दिनांक (६) |
|---|---|---|---|---|---|
| १ | गणेश नावाजी कांबळे, वय ४६ | रा. जुनीपोसरी ता. पनवेल, जि. रायगड | हृदयविकाराचे झटक्याने मृत्यू | ४४१६६ | २८/०५/२०२० |
| २ | अमनसिंह परमसिंह परस्ते, वय १८ | रा. लाडीवली लोना कंपनीजवळ, ता. पनवेल, जि. रायगड | रेल्वे अपघातात गंभीर दुखापती होवून मृत्यू | ५१/२०१९ | ११/१२/२०१९ |
| ३ | आकाश राजेश कांबळे, वय १९ | रा. गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड | विष प्राश केल्यामुळे हृदय विकाराचा झटका येवुन | १४/२०१८ | १२/०६/२०१८ |
| ४ | संतोष मोतीराम घारे, वय ४५ | रा. उमरोली, ता. कर्जत, जि. रायगड | हृदय विकाराच्या झटक्याने | १६/२०१९ | १३/०३/२०१९ |
| ५ | अनोळखी इसम नाव माहित नाही | - | रेल्वे अपघातात गंभीर दुखापती होवून मृत्यू | ४७/२०१९ | २६/१०/२०१९ |
| ६ | अनोळखी इसम नाव माहित नाही | - | पाण्यात बुडून गुदमरुन मृत्यू | ४५/२०१९ | १७/०९/२०१९ |
| ७ | आदित्य आनंद शर्मा, वय २१ | रा. पंचरुखी सिवाम, राज्य बिहार, सध्या रा. ओमसाई प्रसाद लॉज. | गळफास घेवून मृत्यू | १६/२०२० | १८/६/२०२० |

**दत्तात्रय नवले,**
उप विभागीय दंडाधिकारी पनवेल,
उप विभाग पनवेल.

पनवेल,
दिनांक २७ नोव्हेंबर २०२०.

## जिल्हा उप निबंधक सहकारी संस्था, रायगड-अलिबाग यांजकडून

**वाचावे.**—(१) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक क्रमांक पतसंस्था/सआ-५/ वसुली अधिकारी नियुक्ती/फेरनियुक्ती/२०१८, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८.

(२) अवसायक, दि गोरेगाव को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि., (अवसायनात), गोरेगाव, ता. माणगाव जि. रायगड यांचे दिनांक ७ नोव्हेंबर २०२० चा प्रस्ताव.

**आदेश**

क्रमांक जिउनि/कात-६/गोरेगाव अर्बन बँक/का.क. १५६/१२५६/२०१९.— महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, गोपाळ मावळे, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, रायगड-अलिबाग , या आदेशान्वये दि गोरेगाव को-ऑपिरेटिव्ह अर्बन बँक लि., गोरेगाव, ता.माणगाव, जि.रायगड (अवसायनात) या बँकेच्या खालील अधिकाऱ्यांना त्यांच्या नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त झालेली वसुली प्रमाणपत्रांची अंमलबजावणीबाबत करावयाच्या कार्यवाहीपुरती महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ अन्वये व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार खालील अटीस अधीन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२१ वा बँकेची नोंदणी रद्द होईपर्यंत या कालावधीपर्यंत शक्ती प्रदान करीत आहे.

| अ. क्र. | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान करावयाचे अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र जिल्हा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. यु. एल. सहस्त्रबुध्दे | जनरल मॅनेजर, वसुली विभाग इनचार्ज व वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | रायगड जिल्हा |
| २ | श्री. आर. डी. साळवी | शाखाधिकारी, वसुली विभाग इनचार्ज व वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | रायगड जिल्हा |
| ३ | श्री. पी. एम. शेडगे | पासींग ऑफीसर व वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | रायगड जिल्हा |
| ४ | श्री. एस. एस. पांचाळ | अकौटंट, वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | रायगड जिल्हा |

**अटी.—**

१. वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सुचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे प्रदान केलेले अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

२. सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व कलम ९८ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

३. वसुली अधिकारी यांनी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमीत केलेल्या परिपत्रकानुसार दरमहा विहीत नमुन्यात कर्ज वसुलीची माहिती या कार्यालयास सादर करावी.

४. वसुली अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सदर व्यक्ती सेवा निवृत्ती झाल्यास किंवा सदर व्यक्तीस सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

५. वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाहीत.

६. शासन निर्णय क्रमांक संकीर्ण १५०४/प्र.क्र.२३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

७. वसुली अधिकाऱ्यास त्यांच्या नावापुढे कोठेही “ महाराष्ट्र शासन नियुक्त ” आणि किंवा “ सिव्हील कोर्ट ” “ एक्झीक्युटीव्ह कोर्ट ” या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही. त्या ऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे वसुली अधिकारी (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये) असे लिहावे.

८. वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर वसुली अधिकारी, दि गोरेगाव को-ऑप. अर्बन बँक लि., गोरेगाव, ता. माणगाव, जि. रायगड (अवसायनात) असा फलक लावता येईल.

९. वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/जामीनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयकृत बँका वा अन्य बँका यांच्याकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहेत त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी/पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

१०. वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसुलपात्र रक्कम व या कार्यालयाचे कलम १५६ आणि त्याखालील नियम १०७ अन्वये आदेश दिनांक ६ एप्रिल २०१८ मध्ये नमूद केल्याप्रमाणे व दराने अंमलबजावणी खर्चाची रकमेशिवाय इतर कोणतीही रक्कम वसूल करता येणार नाही.

११. मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाकडील दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजीच्या परिपत्रकीय सुचनांचे वसुली अधिकारी यांनी तंतोतंत पालन करावे. बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दरमहा वसुली अधिकाऱ्यांचे कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

१२. वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/आदेश/घोषणा यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

**गोपाळ मावळे,**
जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था,
रायगड-अलिबाग.

अलिबाग,
दिनांक ८ डिसेंबर २०२०.

**उप निबंधक, सहकारी संस्था, एच-पश्चिम विभाग, मुंबई, यांजकडून**

**नोंदणीची अधिसूचना**

क्रमांक एमयूएम/डब्ल्यूएचडब्ल्यू/एचएसजी/टीसी/१६२४६/सन २०२०/१६६०.— उप निबंधक, सहकारी संस्था, एच-पश्चिम विभाग, मुंबई, याद्वारे अधिसूचित करीत आहे की, सेलस्टीयल टॉवर को-ऑप हौसिंग सोसायटी लि., सीटीएस नं. एफ-६०, १५ वा रस्ता, बांद्रा पश्चिम, मुंबई ४०० ०५० नोंदणी क्रमांक एमयूएम/डब्ल्यूएचडब्ल्यू/एचएसजी/टीसी/१६२४६/सन २०२० महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक (९) (१) अन्वये नोंदविण्यात आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण “ गृहनिर्माण संस्था ” असून उप वर्गीकरण “ भाडेकरू सहभागीदारी संस्था ” असे करण्यात आले आहे.

**गौतम वर्धन,**

मुंबई, उप निबंधक, सहकारी संस्था,
दिनांक ११ डिसेंबर २०२०. एच-पश्चिम विभाग, मुंबई.

---

**उप निबंधक, सहकारी संस्था, डी विभाग, यांजकडून**

**नोंदणीची अधिसूचना**

क्रमांक एमयूएम/डब्ल्यू-डी/एचएसजी/(टीसी)/१००४५/०७९३/२०-२१/सन २०२०.— उप निबंधक, सहकारी संस्था, डी विभाग, मुंबई, याद्वारे अधिसूचित करीत आहे की, मागो परम टॉवर को-ऑप., हौसिंग सोसायटी लि., प्लॉट नं. १००-डी, सी.टी.एस. नं. १४७९ ऑफ गिरगांव डिव्हीजन, न्यू सर्वे नं. ८०२३, २/८०२९, जे. एस. एस. रोड, गिरगाव, मुंबई ४०० ००४ महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) याच्या कलम (९) (१) अन्वये नोंदविण्यात आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ चा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण “ गृहनिर्माण सहकारी संस्था ” असून उप वर्गीकरण “ भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था ” असे करण्यात आले आहे.

**डॉ. अविनाश ए. भागवत,**

मुंबई, उप निबंधक, सहकारी संस्था,
दिनांक १४ डिसेंबर २०२०. डी विभाग, मुंबई.

**सहायक निबंधक, सहकारी संस्था, कुडाळ, यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक सनिकु/अ/मथुरा आर्केड गृह/नोंदणी/२०२०/१५३५.— या प्रमाणपत्राद्वारे प्रमाणित करण्यात येते की, मथुरा आर्केड सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कुडाळ, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग संस्था नोंदणी क्र. एसडीजी/केडिएल/एचएसजी/टिसी/५५६/२०२०, दिनांक १५ डिसेंबर २०२० ने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील (१९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४) कलम ९(१) अन्वये नोंदण्यात आलेली आहे.

उपर्निदिष्ट अधिनियम क्रमांक कलम १२(१) अन्वये व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १० (१) व ५ (ब) अन्वये संस्थेचे वर्गीकरण “ गृहनिर्माण संस्था ” असून उप वर्गीकरण “ भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था ” असे आहे.

**के. आर. धुळप,**

सिंधुदुर्ग, सहायक निबंधक,
दिनांक १५ डिसेंबर २०२०. सहकारी संस्था, कुडाळ,
जि. सिंधुदुर्ग.

---

**उप निबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक उपनि/ससं/मुंशपुउकोमं/बी-१/५९९/२०२०.— याद्वारे अधिसूचित करण्यात येत आहे की, ड्रिम टॉवर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, ई-८ व ई-९ बिल्डिंग, न्यू म्हाडा कॉम्प्लेक्स, शांती गार्डन, मिरा रोड (पूर्व), ठाणे ४०१ १०७. नोंदणी क्रमांक टीएनए/एमएचएडीबी/एचएसजी/(टीसी)/८४/२०२०-२०२१ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) यांचा कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ याचा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण “ गृहनिर्माण संस्था ” असून उप वर्गीकरण “ भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था ” असे करण्यात आले आहे.

**डॉ. प्रशांत सोनवणे,**

मुंबई, उप निबंधक, सहकारी संस्था,
दिनांक १९ नोव्हेंबर २०२०. (मुंबई शहर, पूर्व उपनगरे व
कोकण मंडळ कार्यक्षेत्र),
कोकण गृहनिर्माण व
क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,
मुंबई.

**उप निबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक उपनि/ससं/मुंशपुउकोमं/बी-१/६२६/२०२०.— याद्वारे अधिसूचित करण्यात येत आहे की, सुविधा ज्वेल सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, बिल्डींग नं. २, सीएस/सीटीएस नं. १०७४ (पी.टी.) १०७५ (पी.टी) ऑफ विलेज मुलुंड (पूर्व), ९० फूट रोड, केळकर कॉलेज समोर, मुलुंड (पूर्व), मुंबई ४०० ०८१. नोंदणी क्रमांक एमयूएम/एमएचएडीबी/एचएसजी/(टीसी)/८६/२०२०-२०२१ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) यांचा कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ याचा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे करण्यात आले आहे.

**डॉ. प्रशांत सोनवणे,**

मुंबई,
दिनांक २४ नोव्हेंबर २०२०.

उप निबंधक, सहकारी संस्था,
(मुंबई शहर, पूर्व उपनगरे व
कोकण मंडळ कार्यक्षेत्र),
कोकण गृहनिर्माण व
क्षेत्रविकास मंडळ/म्हाडा,
मुंबई.

---

**उप निबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक उपनि/ससं/मुंशपुउकोमं/बी-१/६५३/२०२०.— याद्वारे अधिसूचित करण्यात येत आहे की, लेकशोर हाईट्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, इमारत क्र. १अ, तुंगा पवई, मुंबई ४०००७२. नोंदणी क्रमांक एमयूएम/एमएचएडीबी/एचएसजी/(टीसी)/८९/२०२०-२०२१ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) यांचा कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ याचा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे करण्यात आले आहे.

**डॉ. प्रशांत सोनवणे,**

मुंबई,
दिनांक १ डिसेंबर २०२०.

उप निबंधक, सहकारी संस्था,
(मुंबई शहर, पूर्व उपनगरे व
कोकण मंडळ कार्यक्षेत्र),
कोकण गृहनिर्माण व
क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,
मुंबई.

**उप निबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक उपनि/ससं/मुंशपुउकोमं/बी-१/६५५/२०२०.— याद्वारे अधिसूचित करण्यात येत आहे की, लेक एवेन्यु सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, इमारत क्र. १सी, तुंगा पवई, मुंबई ४०० ०७२. नोंदणी क्रमांक एमयूएम/एमएचएडीबी/एचएसजी/(टीसी)/८८/२०२०-२०२१ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) यांचा कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ याचा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे करण्यात आले आहे.

**डॉ. प्रशांत सोनवणे,**

मुंबई,
दिनांक १ डिसेंबर २०२०.

उप निबंधक, सहकारी संस्था,
(मुंबई शहर, पूर्व उपनगरे व
कोकण मंडळ कार्यक्षेत्र),
कोकण गृहनिर्माण व
क्षेत्रविकास मंडळ/म्हाडा,
मुंबई.

---

**उप निबंधक, सहकारी संस्था, म्हाडा यांजकडून**

**अधिसूचना**

क्रमांक उपनि/ससं/मुंशपुउकोमं/बी-१/६४८/२०२०.— याद्वारे अधिसूचित करण्यात येत आहे की, विणा सेरीनिटी ए बी सी विंग सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सीटीएस नं. ५८ (पी.टी.), व्हिलेज चेंबूर, सहकार नगर, चेंबूर, मुंबई ४०० ०७१. नोंदणी क्रमांक एमयूएम/एमएचएडीबी/एचएसजी/(टीसी)/८७/२०२०-२०२१ ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० (सन १९६१ चा अधिनियम क्रमांक २४) यांचा कलम ९ (१) अन्वये नोंदविण्यात आली आहे व उक्त अधिनियमाच्या कलम १२(१) आणि महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ याचा नियम १०(१) अन्वये तिचे वर्गीकरण " गृहनिर्माण संस्था " असून उप वर्गीकरण " भाडेकरू सहभागीदारी गृहनिर्माण संस्था " असे करण्यात आले आहे.

**डॉ. प्रशांत सोनवणे,**

मुंबई,
दिनांक २७ नोव्हेंबर २०२०.

उप निबंधक, सहकारी संस्था,
(मुंबई शहर, पूर्व उपनगरे व
कोकण मंडळ कार्यक्षेत्र),
कोकण गृहनिर्माण व
क्षेत्रविकास मंडळ, म्हाडा,
मुंबई.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.